SHIVAJI COLLEGE • HINGOLI

ISSN : 2454-2415
Volume VII, Issue 2
February, 2019

# INTERNATIONAL JOURNAL OF INNOVATIVE KNOWLEDGE CONCEPT

www.ijikc.co.in

IJIKC

SONHIRA PUBLICATION

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

68

# International Journal of Innovative Knowledge Concepts

Editor
Pramila M. Jamdade

Language: English

Published by
Sonhira Publication,
204, Om, ChandranganSwaroop Society,
Ambegaon Bk., Near Sinhgad Institute, Ambegaon,
**Pune- 411046**

Copyrights: Editors 2019
All rights reserved

ISSN: 2454-2415

Volume-VII, Issue-2 February, 2019

Available at www.ijikc.co.in

SHIVAJI COLLEGE HINGOLI

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

49

ISSN: 2454-2415
Volume VII, Issue 2, February, 2019

# International Journal of Innovative Knowledge Concepts

## Welcome to IJIKC

**International Journal of Innovative Knowledge Concepts (IJIKC)** is a monthly international journal published in English, Hindi & Marathi for scholars, practitioners, and students. All research papers submitted to the journal will be double – blind peer reviewed referred by members of the editorial board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subject.

Our **aim** is worldwide recognition and fast publication. IJIKC publishes high-quality work from different epistemological, methodological, theoretical, and cultural perspectives and from different regions across the globe. IJIKC makes readers of the change happening in higher education and society as well as research an end us. Our journal helps in providing a convenient, reliable as well as cost effective solution of processing and delivering the publication to the door step of our readers. It provides a forum for innovation, questioning of assumptions, and controversy and debate, and aims to give creative impetuses for academic scholarship and for applications in education, policy making, professional practice, and advocacy and social action.

To achieve these aims, IJIKC will publish original research articles, book reviews, commentaries, correspondence, review articles, technical notes, short communications, case study, books, thesis and dissertation relevant to the fields of Agricultural Science, Ayurved, Biochemistry, Biotechnology, Botany, Chemistry, Commerce, Computer Science, Economics, Engineering, Environmental Sciences, Food Science, Geology, Geography, History, Horticulture, Law, Library & Information Science, Linguistics, Literature, Management Studies, Mathematics, Medical Sciences, Microbiology, Molecular Biology, Nursing, Pharmacy, Physics, Social Science, Zoology, etc.

## Indexed

**International Journal of Innovative Knowledge Concepts (IJIKC)**is included in different indexing agencies, **Google Scholar, Directory of Research Journal Indexing, BASE - Bielefeld Academic Search Engine**etc.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**Editorial Board** | *Advisory Board*

**Editor in Chief**
Mrs. Pramila Mohan Jamdade, Librarian, Tehmi Grant Institute of Nursing Education, Pune., India

**Managing Editor**
Dr. Mohan L Jamdade, Bharati Vidyapeeth \ Deemed to be University, Pune

**Members, Editorial Board**

Dr. BijanGoodarzi, Department of Physical Education and Sports Science , Islamic Azad University, Borujerd Branch, IRAN, Iran, Iran, Islamic Republic of

RakibulHasan, Sub-Editor, The Bangladesh Today (TBT), Bangladesh, Bangladesh

Dr. showkat Ahmad Rather, Department of Education, Aligarh Muslim University, Aligarh, India

Dr. Sunil Kumar Jangir, PhD Coordinator and Ast.Professor, Head, Dept. of Social Science, ShriJagdishPrashadJhabarmalTibrewala University, Jhunjhunu, Rajasthan, India, India

Dr. Ch. Radhika, Department of English University College of Engineering & Technology AcharyaNagarjuna University Nagarjuna Nagar - 522510. Guntur, India

Dr. B.N. Pawar, Principal, Dr. B.N. Purandare Arts, Smt.S.G.Gupta Commerce and Science College, Lonavla, Pune (India)

Dr. R. Hamsalakshmi,, LRG Government Arts College for Women, Palladam Road, Tirupur – 641 604. Tamil Nadu, India, India

Dr. Gopal Sharma, Professor in Political Science Department of Political Science Sitalkuchi College P.O. Sitalkuchi District: Cooch Behar West Bengal PIN- 736158,, India

Dr. SoumanaDatta, Associate Professor Department of Botany University of Rajasthan Jaipur-302001,India,, India

Dr. B.M. Pange, Librarian, Jaykar Library, SavitribaiPhule Pune University Ganeshkhind, Pune, Maharashtra 411007, India, India

Dr. KavitaVerma, Asst. Director, University Sports Board, Banaras Hindu University, Varanasi (U.P.)

Dr. MeenalKedar Oak, Librarian (Selection Grade) & Coordinator IGNOU Study Centre - 16142 MES's Institute of Management & Career Courses(IMCC), Pune, India

***Members, Advisory Board***

Dr. Md.Shahjahan Ali, Professor, Department of Applied Physics Electronics and Communication Engineering, Islamic University, Kushtia-7003, Bangladesh

Dr. P. Malyadri, Principal, Government Degree College, Osmania University, Patancheru, HYDERABAD—502 319 Andhra Pradesh, India, India

Dr. N.B. Dahibhate, Principal Technical Officer, National Chemical Laboratory, Pune,, India

Dr. BiswajitSardar, H.O.D. and Assistant Professor, DhrendraMahila P.G. College, Karamjeetpur, Sunderpur,Varanasi, Uttar Pradesh

Dr. V.S. Mugade, Ex-Librarian, BharatiVidyapeeth University, Pune, India

**SUBSCRIPTIONS**

| Type | Subscription for Online | Subscription for Online & Print |
|---|---|---|
| Subscription for Indian Users | 1500/- | 2000/- INR |
| Subscription for Foreign Users | 30 USD | 70 USD |
| Institutions in India | 5000 | 6000/- INR |
| Institutions in out side India | 100 USD | 400 USD |

**Mode of Payment**

1. **Internet Transfer / Online Transfer**:- You can paying subscriptions through Net Banking Facility.
2. **Cash Deposit**:- You can also make payment by cash deposit in following bank.
3. Pay Pal : Paypal id is : drmohanjamdade@gmail.com
4. Money Gram or Western Union : in faviour of **Mohan Laxman Jamdade**

| | |
|---|---|
| BANK NAME | State Bank of India |
| Bank Address | Hingne (Khurd), Vithalwadi, Vrishidetu, Singhagad Rd, Pune |
| Bank Account Name | Pramila Mohan Jamdade |
| Bank Account Number | 33851944480 |
| Branch Code | 7159 |
| IFS Code | SBIN0007159 |
| MICR Code | 411002017 |
| SWIFT Code | SBININBB249 |

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

51

# CONTENTS


| Sr.No. | Article Name | Author Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | ICT Training for Management Teachers | Pramod Pawar,<br>Sachin Ayarekar | 01-05 |
| 2. | Endemic Skeletal Fluorosis and Local Perception in Telangana, South India | Venkatesh Boddu | 06-16 |
| 3. | Tagore's Songs ; As a Subtext Of Sanskrit Literature | Tanusweta Chattopadhyay | 17-22 |
| 4. | Impact of Common Herb Chitrak (Plumbago Zeylanica) in Improving Nutritional Status and Related Indicators in Overweight and Obese Women | Ankita Sharma<br>Nimali Singh<br>Shankar Rao<br>Roopraj Bharadwaj | 23-27 |
| 5. | Detraditionalization: An Upshot of the Indigenous Social Coercions in Indian Rural Societies during the Twentieth Century: A Reading of Social Change in Indian Classics | P. John Joseph Kennedy,<br>R. Retna Mony | 28-34 |
| 6. | Origin and Development of Dhruvapada | Sutapa Bandyopadhyay | 35-39 |
| 7. | Necessity of innovations in teaching English in the schools of Tripura: An Overview | Jantu Das,<br>Rakesh Sen | 40-43 |
| 8. | Autonomous Status to Higher Education Institutions in Kerala:Students and Teachers Perception | Sidhique Aslam,<br>V. P Joshith | 44-49 |
| 9. | Concept of model school a boon for rural talented students: an evidence from Andhra Pradesh, India | Subhashini Bada,<br>R. Siva Prasadh | 50-53 |
| 10. | Health Care System in India – A Comparative Analysis | Sunitha L F | 54-58 |
| 11. | Glaciers recession and their impact: Some observation from Panpatiya, Bhagnyu bank and Tipra glaciers using Geospatial methods, Uttrakhand State, India | Syed Shams Rizvi<br>H.C. Nainwal<br>Prabhat Semwal<br>Sarfaraz A. Ansari<br>Tushar Sharma | 59-65 |
| 12. | Narratives of Resistance: Trauma, Hybridity and the Veil's Resurgence in Mohja Kahf's The Girl in the Tangerine Scarf | Sidhique P.,<br>Abdul Mohammed Ali Jinnah | 66-68 |
| 13. | The Echo of Status Quo in the Portrait by Aldous Huxley | D Buvaneswari | 69-70 |
| 14. | Ethnicity and Politics of Identity in Nagaland: AStudy of Easterine Kire Iralu's Bitter Wormwood | Poornima R | 71-74 |
| 15. | Evolution Of Legal System In Travancore : A Historical Introspection | Vishnu Sreevalsan | 75-83 |
| 16. | Ethiopianism. Anti "Whiteness", Racism and anti-ethnicity movement: Philosophical and Historical analysis | Teshome Abera | 84-88 |



SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

| Sr.No. | Article Name | Author Name | Page No. |
|---|---|---|---|
| 17. | Oral Tradition and Writing History: A Case Study of Kathivanur Veeran Thottam | Nimisha P | 89-93 |
| 18. | Microscopic Analysis of Natural and Reinforce Bar Of Phoenix Sylvestris | R.S. Chouhan, M.S.Chouhan B.D. Shrivastava A. Mishra S. Phadke | 94-97 |
| 19. | Caring of Tuberculosis Patients: A Study of Psychosocial Factors | Choudhary, G.N, Ahmed, A | 98-104 |
| 20 | Signs of Nature: Traditional Use of Bio-indicators in Agriculture and for Predicting Weather among the Sonowal Kachari tribe of Assam, India | Ripunjoy Sonowal | 105-113 |
| 21 | Comparison of hydrolases and oxidoreductases of two major folivorous Pests, Buzura suppressaria and Eterusia magnifica of Tea from Darjeeling Foothills and surrounding areas | Mayukh Sarker | 114-120 |
| 22 | A Study on Crowd Funding and Its Regulations in India | Brindha.N | 121-123 |
| 23 | Tech-Enabled Learner Support Services in ODL: A Study of Awareness among Prospective Teachers | Gulfeshan Naaz H. Khatija Begum | 124-128 |
| 24. | Fault Criteria at Design stage with Cohesion Metrics | Brijesh Kumar Bhardwaj | 129-131 |
| 25. | Open Educational Resources: Awareness among Prospective Teachers of Indian Central Universities | Ameen Ansari, H. Khatija Begum | 132-137 |
| 26. | Television Viewing and Audience Attitudes on Gender Traits | Beulah Rachel Rajarathnamani | 138-140 |
| 27. | Postural Impairments in Primi-para Women after One Year of Delivery | Sandeep Babasaheb Shinde, Asavari Jeevankumar Gaikwad | 141-146 |
| 28. | Effect of psycho-education on Knowledge regarding cirrhosis of liver among patients with alcoholic liver cirrhosis | B.Venkatesan T. V Ramakrishanan G.Vijayalakshmi S.J. Nalini | 147-150 |
| 29. | Consumer Inclination Towards M-Wallets: A study of Delhi | Diksha Goel | 151-157 |
| 30. | Ecoconsciousness in A. K. Ramanujan's Poetry | Balkrishna Magade | 158-161 |
| 31. | Victims of Race, Class and Gender: Women in Toni Morrison's The Bluest Eye | Hariom Singh | 162-166 |
| 32. | केदारनाथ अग्रवाल के काव्य में प्रगतिवादी चेतना | सुधीर गणेशराव वाघ | 167-171 |
| 33. | वैश्वीकरण के दौर में संगीत | स्वाति शर्मा | 172-174 |
| 34. | 'जात आणि मतदान वर्तन : विशेष संदर्भ उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातील चर्मकार समाज' | राजेंद्र दिलीप आगवाने | 175-179 |
| 35. | नरहर कुरूंदकरांचे सामाजिक लेखन: एक ऐतिहासिक अभ्यास | क्षिरसागर बी. एस. | 180-183 |
| 36. | मराठी भाषेची जडणघडण, संवर्धन व उपयोगिता | ईश्वर सोमनाथे | 184-189 |
| 37. | Problems in Biomedical Medical Ethics: A Philosophical Reflection | Md. Akramul Haque | 190-194 |
| 38 | A Study to Assess the Effectiveness of Self Instructional Module on the Practices of Staff Nurses Regarding Administration of IV Injection through Existing IV Port In Paediatric Ward of Selected Hospitals in Pune | Sreelekha Rajesh | 195-201 |


SHIVAJI COLLEGE, HINGOLI

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

53

ISSN : 2454-2415 Vol. 7, Issue 2, February, 2019

# नरहर कुरूंदकरांचे सामाजिक लेखनः एक ऐतिहासिक अभ्यास

क्षिरसागर बी. एस.
इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय , हिंगोली.

**सारांश**

सामाजिक प्रबोधन करणा–या समाजसुधारकांची मोठी परंपरा महाराष्ट्रास लाभली आहे. व्यक्तीने समाजासाठी काही करणे हा 'मानवधर्म' आहे. परंतु प्रत्येकजण हा 'मानवधर्म' पाळत असतो असे नाही. बहुतांश लोक आपल्या वैयक्तिक परिघातून बाहेरच येत नाही. मात्र काही महापुरूषांनी आपल्या प्रज्ञेने निरनिराळया विषयांचे सतत अध्ययन, चिंतन–मनन करून आपले विचार निर्भिडपणे मांडुन समाजपरिवर्तन केले. हा वारसा नरहर कुरूंदकरांनी जोपासुन समाजहितासाठी उभे आयुष्य खर्ची केले. नरहर कुरूंदकरांनी केलेले सामाजिक लेखन त्यांच्या लेखातून, भाषनातुन, विविध ग्रंथांना लिहलेल्या प्रस्तावनेतून दिसुन येते. विसाव्या शतकातील 6] 7 व 8 वे दशक हे मराठवाडयामध्ये कुरूंदकरांच्या विचारप्रणालीतुन घडत होते. महाराष्ट्राला पुरोगामी विचारप्रणालीतून वाटचाल करावयास लावणारे समाजप्रबोधनकार म्हणुन ते प्रसिध्द आहेत. राजकारणापासून ते समाजकारणापर्यत योग्य मार्गदर्शन मिळणारे एकमेंव केंद्र म्हणजे नरहर कुरूंदकर.

'भजन', 'मागोवा', 'जागर', शिवरात्र', मधून त्यांचे सामाजिक विचार प्रकर्षाने दिसून येतात. भारतीय समाजाने विज्ञाननिष्ठ व्हावे हे विवेचन त्यांनी आपल्या ग्रंथातुन केले आहे. हिंदू समाजाचा इतिहास विविधतेतील एकतेचा इतिहास नाही, तर तो परस्परांच्या सुख–दुःखाविषयी उदासीन असणा–या शेकडो भिन्न–भिन्न गटांच्या आत्मघातकी रचनेचा इतिहास आहे. विज्ञानाने प्रगती करूनही आजही समाज धर्माच्या मुळ गाभ्यालाच चिकटलेला आहे. खरे म्हणजे समाज जीवनाच्या सार्वजनिक कक्षेतून 'धर्म' बाजूला सारणे आणि तो केवळ पारलौकिक बाबींसाठी मर्यादीत करण्याची नितांत आवश्यकता आहे असे कुरूंदकर आग्रहाने प्रतिपादन करतात. गुलामगिरी विरूध्द समाजातील कनिष्ठ वर्गातील लोकांनी चळवळ उभी केली पाहिजे असे सांगणारे कुरूंदकर पहिले दलित पुढारी होते'', दलिताविषयी त्यांच्या मनात विशेष आस्था होती. दलित व मुस्लिमांचे प्रश्न जागृतपणे, बुध्दिनिष्ठेने, निस्पृहवृत्तीने पुरोगामी विचाराच्या संघटनांनी सोडविले पाहिजे. त्याशिवाय समाज परिवर्तन होणार नाही. वर्णव्यवस्थेची व विषमतेची सगळी कल्पनाच आपण इतिहास जमा समजून बाजूला सारली पाहिजे. अशाप्रकारे कुरूंदकरांनी आपले विचार विविध ग्रंथामधून प्रखरतेने मांडले आहेत.

हिंदु, मुस्लिम, किंवा बुध्दधर्मिय कोणत्याही समाजाचे धर्मातील राष्ट्र निर्माण झाले तरी समताधिष्ठीत समाज निर्माण होणार नाही. समान नागरी कायदा, लोकशाही समाजवादाच्या आश्रयाशिवाय शक्य नाही. कारण या पायावरच ख–या रामराज्याची, शोषणरहित समाजाची उभारणी होऊ शकेल अशी कुरूंदकरांची धारणा आहे. प्रत्येक धर्मातील लोकांनी चमत्कारापासून दूर राहिले पाहिजे असा कुरूंदकरांनी संदेश देऊन गाडगे महाराजांचे कार्य ख–या दृष्टीने समाजोपयोगी होते. असे प्रतिपादन केले. चमत्काराचे सामाजिक मूल्य शुन्य आहे. कारण चमत्कार करणा–या साधु संताने आपले सामर्थ्य देशाच्या कल्याणासाठी वापरलेले आढळून येत नाही. '' त्यामुळे बुध्दीवाद्यांनी अशा बाबींविरोधी समाज जागरण करण्याची गरज आहे. तरच मानसाची बुध्दी जागृत राहिल. यासाठी कुरूंदकर सदैव प्रयत्नशील राहिले. ''चमत्काराने मानसाची बुध्दी आंधळी होते''

स्त्रियांच्या उन्नती संदर्भात कुरूंदकर अधिक जागृत होते. स्त्रियांचे आयुष्य खडतर आहे स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जात नाही. याची त्यांना खंत होती. नरहर कुरूंदकर हे परिपूर्ण स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. ''माणूस सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय गुलामगिरीतून मुक्त झाला पाहिजे, अशा पध्दतीच्या सर्वांगीण स्वातंत्र्यावर त्यांची श्रध्दा होती. ते पुरोगामी विचारप्रणालीतून समाजाकडे पाहत होते. प्रबोधनवादी विचाराचा वारसा जोपासुन आपल्या वाणीने व लेखणीने सा–या महाराष्ट्राचे लक्ष त्यांनी वेधून घेतले. वैचारिक क्षेत्रामध्ये कुरूंदकर हे मराठवाडयाचे खरे मानबिंदु होते.

किवर्ड : निरहर कुरूंदकर, निरहर कुरूंदकरांचे सामाजिक लेखन

## प्रस्तावना

समाजाला प्रबोधन करणा–या समाजसुधारकांची मोठी परंपरा महाराष्ट्रास लाभली आहे. व्यक्तीने समाजासाठी काही करणे हा 'मानवधर्म' आहे. परंतु प्रत्येकजण हा 'मानवधर्म' पाळत असतो असे नाही. बहुतांश लोक आपल्या वैयक्तिक परिघातून बाहेरच येत नाही. मात्र काही महापुरूषांनी आपल्या प्रज्ञेने निरनिराळया विषयांचे सतत अध्ययन, चिंतन–मनन करून आपले विचार निर्भिडपणे मांडुन समाजपरिवर्तन केले. संत ज्ञानेश्वर महाराजांपासुन समाजाला गतीमान करण्याचे प्रयत्न भारतात झाले आहेत. लोकहितवादी, न्या. रानडे, चिपळुनकर, टिळक, आगरकर म. फुले, राजश्री शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व विचारवंतानी निद्रिस्त समाजाला जागे करण्याचा, नवी दृष्टी देऊन पुरोगामी करण्याचा प्रयत्न केला आहे. हाच वारसा नरहर कुरूंदकरांनी जोपासुन समाजहितासाठी उभे आयुष्य खर्ची केले. नरहर कुरूंदकरांनी केलेले सामाजिक लेखन त्यांच्या लेखातून, भाषनातुन, विविध ग्रंथांना लिहलेल्या प्रस्तावनेतून दिसुन येते.

विसाव्या शतकातील 6] 7 व 8 वे दशक हे मराठवाडयामध्ये कुरूंदकरांच्या विचारप्रणालीतुन घडत होते. महाराष्ट्राला पुरोगामी विचारप्रणालीतून वाटचाल करावयास लावणारे समाजप्रबोधनकार म्हणुन ते प्रसिध्द आहेत.[1] अनेक समाजसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, कुरूंदकरांच्या पुढाकाराने कार्यरत आहेत. त्यांनी परित्यक्ता व विधवांसाठी एस. आर. देशपांडे यांना एक शाळा 'कंडेण्सड कोर्स'[2] घेऊन सुरू केली. अशी अनेक समाजोपयोगी कार्य केल्यामुळे लोक ''न लगे चंदना सांगावा परिमळ वनस्पती मळे होफारून''[3] या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे समाजात त्यांचा आदर होत असे. नांदेड येथील 'संस्कृत पाठशाळा', 'अभिनव चित्रशाळा', 'नेरली कुष्ठधाम' अशा विविध संस्थांना कुरूंदकरांचा आधार होता. दलित समाजाविषयी तर कुरूंदकरांना मोठी तळमळ होती. ''कुरूंदकर, दलिताचे खरे मित्र होते.[4] दलिताविषयी त्यांच्या मनात विशेष आस्था होती. तत्वज्ञानापासून ते समितीपर्यत राजकारणापासून ते समाजकारणापर्यत योग्य मार्गदर्शन मिळणारे एकमेंव केंद्र म्हणजे नरहर कुरूंदकर. राजकारणापासून ते समाजकारणापर्यत योग्य मार्गदर्शन मिळणारे एकमेंव केंद्र म्हणजे नरहर कुरूंदकर.[5] त्यांनी जे सामाजिक कार्य केले. ते लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळुणकर, आगरकर यांच्या परंपरेतील नरहर कुरूंदकर हे एक महान दुवा होते. प्रबोधनवादी विचाराचा वारसा जोपासुन आपल्या वाणीने व लेखणीने सा–या महाराष्ट्राचे लक्ष त्यांनी वेधून घेतले.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI
SHIVAJI COLLEGE HINGOLI

ISSN : 2454-2415 Vol. 7, Issue 2, February, 2019

वैचारिक क्षेत्रामध्ये कुरूंदकर हे मराठवाडयाचे खरे मानबिंदु होते.

कुरूंदकरांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथांच्या नावावरूनच त्यांची समाज परिवर्तनाची तळमळ स्पष्ट होते. जसे 'भजन', 'मागोवा', 'जागर', शिवरात्र', मधून त्यांचे सामाजिक विचार प्रकर्षाने दिसून येतात. भारतीय समाजाने विज्ञाननिष्ठ व्हावे हे विवेचन त्यांनी आपल्या ग्रंथातुन केले आहे. याशिवाय वैज्ञानिक दष्टिकोनाबरोबरच धर्मनिरपेक्ष नितीमुल्यांची सार्वजनिक जीवनात प्रस्थापना महत्वाची आहे.''[6] असे त्यांचे ठाम मत होते. विज्ञानाला महत्वाचे स्थान आहे. पण त्यासही मर्यादा आहेत. अन्न मिळाल्यास माणूस झिजून–झिजून मरतो, हे सांगणे विज्ञानाचे काम आहे. परंतु मानसाने जगावे की जगु नाही हे सांगणे विज्ञानाचे काम नाही. विज्ञान रोगावर औषध सांगते. औषध वापरून रोगी दुरूस्त करावा कि करू नाही हे विज्ञान सांगत नाही. विज्ञानाचा मानवी जीवनाला उपयोग असतो. वैज्ञानिक सत्य समजावून घेवुनच विचार करावा लागतो. पण जीवनात काय असावे. त्याच्या दिशा विज्ञान दाखवू शकत नाही.''[7] अशाप्रकारे ते विज्ञानाची मर्यादा स्पष्ट करतात.

धर्मातीत लोकशाही, समाजवादांवर कुरूंदकरांची निष्ठा होती. समान नागरी कायदा, सक्तीने प्राथमिक शिक्षण, विषमतेचे कमी प्रमाण, जीवनमान उंचावणे, मागासलेल्या वर्गाला संरक्षण आणि जीवनमान वाढविण्यासाठी उत्पादन वाढ या बाबी एकसंघ समाजरचनेच्या प्रकियेचा भाग आहेत. समाजपुरूषांच्या मनावरील जळमट झटकुन जावून नवी दृष्टी प्राप्त व्हावी असे त्यांना वाटते. ''काशीस जावे नित्य वदावे''[8] या उक्तीप्रमाणे त्यांचे आचरण आहे. हिंदू समाजरचना, ही गुलामगीरीचा पुरस्कार करणारी आहे. हिंदुतील वरिष्ठ वर्णातील लोकांची समाजसुधारणेला माण्यता असली, तरी वरिष्ठ वर्णातील लोक जून्या समाजरचनेचा धिक्कार करण्यास कधी पूढे येत नाही. हेच लोक हिंदू समाजाचा इतिहास म्हणजे विविधतेतील एकतेचा इतिहास आहे. असे प्रतिपादन करतात. या संदर्भात कुरूंदकर म्हणतात. हिंदू समाजाचा इतिहास विविधतेतील एकतेचा इतिहास नाही, तर तो परस्परांच्या सुख–दुःखाविषयी उदासीन असणा–या शेकडो भिन्न–भिन्न गटांच्या आत्मघातकी रचनेचा इतिहास आहे. ''गुलामगिरी विरूध्द समाजातील कनिष्ठ वर्गातील लोकांनी चळवळ उभी केली पाहिजे असे सांगणारे कुरूंदकर पहिले दलित पुढारी होते'',[9] म. फुलेंच्या विचाराचा मोठा प्रभाव त्यांच्यावर होता.

वर्णव्यवस्था एक सामाजिक रचना म्हणून कधी अस्तीत्वात नव्हती. वर्णव्यवस्था हा समाजरचनेचा भाग नसून असलेल्या समाजाचे तर्कशुध्द स्पष्टीकरण करण्याचा धडपडीचा तो भाग आहे. एकूण ''वर्णव्यवस्था हा एक जुनाट मनाचा अविष्कार आहे.''[10] खरे म्हणजे वर्णव्यवस्थेची व विषमतेची सगळी कल्पनाच आपण इतिहास जमा समजून बाजूला सारली पाहिजे. अशाप्रकारे कुरूंदकरांनी आपले विचार विविध ग्रंथामधून प्रखरतेने मांडले आहेत. कुरूंदकर समाजवादाची जोड अर्थाशी न लावता ते नैतिकतेशी लावतात. भारतीय राजकारण परंपरागत जातीव्यवस्थेमुळे व उदारमतवादी भांडवलशाहीमुळे फारच गुंतागुंतीचे झाले. प्रत्येक जातीला राजकीय सत्तेची हाव सुटने साहजिकच आहे. पण पुन्हा प्रत्येक जातीत श्रेष्ठ, कनिष्ठ, दरिद्री व सधन असे वर्ग आहेतच, यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होउ शकतो. वर्गलढा म्हणजे एका वर्गाने दुस–या वर्गावर स्वामित्व गाजवावे या उद्देशाने चाललेला लढा नव्हे. शोषक व शोषित यांच्यात असणा–या लढयाचा हेतु आज जे शोषक आहेत त्यांना शोषित करावे. हा लढा कशासाठी तर जातीव्यवस्थाच नष्ठ करण्यासाठी असावा.''[11] अशा लढयाला कुरूंदकर वर्ग–वर्ण समन्वयाचा लढा असे म्हणतात. दलित व मुस्लिम समाजाच्या उध्दारासाठी उच्चवर्णीयांनी मोकळया मनाने पुढे येउन सर्व सवलती मध्ये त्यांना मदत करायला पाहिजे. दलितांच्या न्यायहक्कांसाठी इतरांनी प्रयत्न करावे, केवळ मताच्या स्वरूपातच दलितांचा अनुनय करणे योग्य नाही. दलितांच्या अनुनय मिळविण्यासाठी त्यांचे प्रश्न उचलले जात आहेत. परंतु त्याचे स्वरूप हे केवळ राजकीय आहे. हे स्वरूप सामाजिक दृष्टीने होणे आवश्यक आहे. याबाबत कुरूंदकरांनी विपूल प्रमाणात लेखन केले आहे. त्यांच्यामते, दलित व मुस्लिमांचे प्रश्न जागृतपणे, बुध्दिनिष्ठेने, निस्पृहवृत्तीने पुरोगामी विचाराच्या संघटनांनी सोडविले पाहिजे. त्याशिवाय समाज परिवर्तन होणार नाही.

'धर्म' संकल्पनाही कुरूंदकरांनी स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते समाजाच्या प्रगतीमध्ये शोषित समाजच मुळ अडथळा आहे. यापाठीमागील गोंधळाचे खरे कारण म्हणजे 'धर्म' होय, माणूस धर्मावर श्रध्दा ठेवून वागत आला. त्यामध्ये अंधश्रध्दाचाच भाग अधिक आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी अंधश्रध्दा संपेल असे नाही. सुधारलेल्या जगात सुध्दा मानवी मनाची धार्मिकता कमी झालेली नाही. कारण माणुस हा पूर्णपणे विचारप्रधान असा प्राणी आहे.''[12] यामुळे विज्ञानाने प्रगती करूनही आजही समाज धर्माच्या मुळ गाभ्यालाच चिकटलेला आहे. खरे म्हणजे समाज जीवनाच्या सार्वजनिक कक्षेतून 'धर्म' बाजूला सारणे आणि तो केवळ पारलौकिक बाबींसाठी मर्यादीत करण्याची नितांत आवश्यकता आहे असे कुरूंदकर आग्रहाने प्रतिपादन करतात. राजकारणात सेक्युलॅरिझमचा विचार नेहमी अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी होत आहे. ही मोठी चूक आहे.''[13] असे कुरूंदकरांनी परखड शब्दात मांडले आहे.

मुस्लिम समाज समान नागरी कायदा करण्यास सहसा तयार होत नाही. त्यासाठी हमीद दलवाई सारखे निष्ठावंत कार्यकर्ते पूढे यायला हवेत. अशा नेत्यामार्फत मुस्लिम सत्यशोधक समाजाचे कार्य सातत्याने चालविले पाहिजे. हिंदु, मुस्लिम, किंवा बुध्दधर्मिय कोणत्याही समाजाचे धर्मातील राष्ट्र निर्माण झाले तरी समताधिष्ठीत समाज निर्माण होणार नाही. समान नागरी कायदा, लोकशाही समाजवादाच्या आश्रयाशिवाय शक्य नाही. कारण या पायावरच ख–या रामराज्याची, शोषणरहित

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

समाजाची उभारणी होऊ शकेल अशी कुरूंदकरांची धारणा आहे. 'केल्यानेच होतची आहे' यावर त्यांचा विश्वास आहे.

बुवाबाजीचा दांभिकपणा समाजाला पोकळ करित आहे. विज्ञानरूपी युगातसुध्दा बुवाबाजी करणा–या साधू संतांचा गवगवा असणे ही फार मोठी शोकांतिका आहे. सत्यसाईबाबा भगवान रजनीस, श्री स्वामी शुकानंद महाराज यांनी जे चमत्कार केले, ते विज्ञानाच्या प्रयोगामध्ये टिकू शकत नाही. याशिवाय येशुख्रिस्ता, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, महमंद पैगंबर यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या चमत्कारासही वैज्ञानिक पुरावा नाही. ''धर्म हे तत्वतः चमत्काराच्या विरोधी आहे.''[14] यामुळे प्रत्येक धर्मातील लोकांनी चमत्कारापासून दूर राहिले पाहिजे असा कुरूंदकरांनी संदेश देऊन गाडगे महाराजांचे कार्य ख–या दृष्टीने समाजोपयोगी होते. असे प्रतिपादन केले. चमत्काराचे सामाजिक मूल्य शुन्य आहे. कारण चमत्कार करणा–या साधु संताने आपले सामर्थ्य देशाच्या कल्याणासाठी वापरलेले आढळून येत नाही.''[15] त्यामुळे बुध्दीवाद्यांनी अशा बाबींविरोधी समाज जागरण करण्याची गरज आहे. तरच मानसाची बुध्दी जागृत राहिल. यासाठी कुरूंदकर सदैव प्रयत्नशील राहिले. ''चमत्काराने मानसाची बुध्दी आंधळी होते''[16] परंतु तरीही चमत्कार करणा–या साधूंवर लोकांची श्रध्दा असते. याचे प्रमुख कारण मानसाच्या इच्छाप्राप्ती होय. खरे म्हणजे चमत्कार करणारे बाबा हे समाजमत पांगळे व दुबळे करूण समाजाची उपक्रमशिलता नष्ठ करतात. चमत्कार मागासल्या जीवनाला मागासलेल्या पणातच जाण्याची आत्महानीकार सवय लावतात.....[17] बुवाबाजी करणारे साधुसंत हे मानवता द्रोही उद्योग करणारे उद्योगपती आहेत. म्हणून बुध्दीवादी, विवेचक आणि विज्ञाननिष्ठांनी अशा ढोंगी, दांभिक, असत्यवादी चमत्कार करणा–या साधूसंतांचा तिरस्कार केला पाहिजे. असे आग्रही मत कुरूंदकरांनी मांडले आहे.

नरहर कुरूंदकर हे परिपूर्ण स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. ''माणूस सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय गुलामगिरीतून मुक्त झाला पाहिजे, माणसाची मतेही स्वतंत्र झाली पाहिजे. आणि मानवी समुहच राष्ट्र म्हणून उभे असतात. ते समुहही स्वतंत्र असले पाहिजे.''[18] अशा पध्दतीच्या सर्वांगीण स्वातंत्र्यावर त्यांची श्रध्दा होती. ते पुरोगामी विचारप्रणालीतून समाजाकडे पाहत होते.

स्त्रियांच्या उन्नती संदर्भात कुरूंदकर अधिक जागृत होते. स्त्रियांचे आयुष्य खडतर आहे स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जात नाही. याची त्यांना खंत होती . ब–याच मुलींना–स्त्रियांना त्यांनी विनामूल्य शिकविले. परंतु स्त्रियांना केवळ स्त्री म्हणून नौकरीत सवलती मिळाव्यात. त्यांच्यावर दया दाखवावी असे मात्र त्यांना वाटत नसे. कूरूंदकरांचा ज्या संस्थेशी संबंध होता त्या संस्थेत या गोष्टी होणार नाहीत हे ते कटाक्षाने पाहत. स्त्रियांनी खुप वाचायलास, लिहायला पाहिजे.[19] असे त्यांना वाटे, असे कार्य करणा–या ज्या महिला समोर येत त्यांना ते हर परीने मदत करीत होते. मात्र एखादी सामाजिक संस्था, एखाद्या प्रस्थापित मासिकांच संपादन मंडळ, नाहीतर कुणी कारखानदार, भांडवलदार, पुढारी असो. स्त्रियांचा अनादर करणा–यांवर निर्भिड टिका करायला कुरूंदकरांनी कधी मागेपूढे पाहिल नाही. हे त्यांचे कार्य समाज जागृतीसाठी महत्वाचे ठरते. नरहर कुरूंदकरांनी संपूर्ण महाराष्ट्र भर आपल्या वाणीने व लेखनीने तीन दशके समाज प्रबोधन केले. त्यांचे हे कार्य ऐतिहासिक्दृष्टया महत्वाचे आहे.

## सारांश

महाराष्ट्रभर तीन दशके आपल्या वाणीने व लेखनीने परखड विचार मांडणारे नरहर कुरूंदकर हे ख–या दृष्टीने–समाज प्रबोधनकार होते. ज्या मातीत, ज्या मानसात, समाजात, व राष्ट्रामध्ये आपण जगतो त्यांचे ऋण हे असतातच ते दाईत्व, कर्तव्य, विसरता कामा नाही. या विचाराची त्यांनी सदैव जाणीव ठेवली. परंतु त्यांनाही काही मर्यादा होत्या, कारण प्रत्येक व्यक्तीमध्ये काही दुस–याविषयी पूर्वग्रह, गैरसमज हे असतातच तसे कुरूंदकरांमध्येही होते. त्यांची त्यांना जाणीवही होती. याविषयी त्यांनी आपले मत 'माझा ध्येयवाद' या भाषणातून मांडले आहे. मा या रक्तामध्ये काही पूर्वग्रह आहेत ते संपविण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. ते संपतील असे मला वाटत नाही. तरीही हा झगडा मी करीत आहे. हेच माझे दायित्व व जबाबदारी आहे. या दृष्टीकोणातून त्यांनी समाजातील प्रत्येक व्यक्तीकडे पाहिले आहे, शिक्षक, प्राध्यापकांनी समाज जागृतीच्या कार्यामध्ये अग्रेसर असायला पाहिजे. त्याशिवाय समाज परिवर्तन होणे कठिण आहे. फ्रान्समध्ये जे कार्य इ.स. 1789 च्या क्रांतीमध्ये प्राध्यापकांनी, शिक्षकांनी केले तेच कार्य करण्याची गरज आज महाराष्ट्राला, देशाला आहे. नरहर कुरूंदकरांचे सामाजिक लेखन हे वरवरचे नसून कोणत्याही विषयाच्या अगदी मुळाशी जाउन त्या विषयाचा त्यातील सर्व बारकाव्यासह अभ्यास करण्याची त्यांची पध्दत मार्मिक आहे. समाजातील विविध प्रश्नावर त्यांनी चिंतन–मनन करून मांडलेले विचार हे केवळ बुध्दीवाद्यांची बौध्दीक कसरत म्हणून उपेक्षा करण्याजोगे नाहीत, हे कुणालाही मान्य करावे लागेल. कुरूंदकरांनी आपल्या लेखणी व वाणीद्वारे सतत समाजप्रबोधनाचे कार्य कोणाची भीड–भाड न बाळगता केले. त्यांचे जीवन म्हणजे एक महान यज्ञच आहे. असे म्हणने वावगे ठरणार नाही. त्यांच्या समाजप्रबोधनाच्या कार्यावरून ते मराठवाडयाचे, महाराष्ट्राचे मानबिंदू होते. वैचारिक चळवळीचे अग्रणी व आग्रही होते हे दिसून येते.

## संदर्भ सुची

1- भगत दत्ता (संपा), 'कै. नरहर कुरूंदकर स्मृति विशेषांक', नांदेड पीपल्स, 1981] i`- 47
2- वाडीकर भू. द., ज्ञानर्षी नरहर कुरूंदकर, नांदेड, संगत प्रकाशन, 2005]पृ. 45
3- भगत दत्ता (संपा), 'कै. नरहर कुरूंदकर स्मृति विशेषांक', पूर्वोक्त पृ. 112

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

ISSN : 2454-2415 Vol. 7, Issue 2, February, 2019


4- कित्ता पृ. 125
5- कित्ता पृ. 127
6- भगत दत्ता,(संपा) 'कै. नरहर कुरूंदकर स्मृति विशेषांक', पूर्वोक्त पृ. 49
7- कुरूंदकर नरहर, 'जागर', पुणे, देशमुख आणि देशमुख कंपनी, 2005 i`- 20 (प्रस्तावना)
8- भगत दत्ता (संपा), 'कै. नरहर कुरूंदकर स्मृति विशेषांक', पूर्वोक्त पृ. 50
9- जोशी, द. पं. साधन नलिनी (संपा), 'गोदातरीचे कैलास लेणे', आंध्रप्रदेश, मराठी साहित्य परिषद, 12 नोव्हें 1983 पृ. 200
10-कुरूंदकर नरहर, 'यात्रा', नांदेड, शारदा प्रकाशन, जूले 1972, पृ. 49&77
11-कुरूंदकर नरहर, 'भजन' पूणे विद्या प्रकाशन पृ. 7&12
12-कुरूंदकर नरहर, 'वाटा माझया–तुझया' राष्ट्रसेवादल प्रकाशन, जाने 1972 पृ. 51
13-भगत दत्ता, (संपा), कै. नरहर कुरूंदकर स्मृति विशेषांक', पुर्वोक्त पृ. 54
14-कुरूंदकर नरहर, 'यात्रा', पुर्वोक्त पृ. 111
15-कित्ता, पृ. 115
16-कित्ता, पृ. 117
17-कित्ता, पृ. 118
18-कित्ता, पृ. 128
19-कुरूंदकर नरहर, 'शिवरात्र', पुणे, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, ऑगस्ट 2001 (प्रस्तावणा)


SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

57